**रवि:** अगदी बरोबर माया ! आपल्याला पृथ्वीची काळजी घ्यायला हवी.

**माया:** हो रवि! आपण निसर्गाची काळजी घेतली तर निसर्गही आपली काळजी घेईल.

**१. मायाबरोबर कोण बोलत आहे?**

अ. राजू

ब. रवि

क. राज

ड. रोहन

**२. पूर आल्यावर काय होते?**

अ. जमीन हलते.

ब. पाणी सगळीकडे साचते आणि काही वेळा घरे, रस्ते, झाडे तुटतात.

क. जोराचा वारा वाहतो.

ड. खूप गरमी होते.

**३. वादळ म्हणजे काय?**

अ. झिमझिम पाऊस

ब. जोराचा वारा आणि मुसळधार पाऊस

क. उन्हाळ्याचा दिवस

ड. बर्फाळ वादळ

**४. आपण निसर्गाची मदत कशी करू शकतो?**

अ. झाडे लावणे, जागा स्वच्छ ठेवणे, आणि पाणी वाया जाऊ न देणे

ब. झाडे तोडणे

क. पर्यावरण प्रदूषित करणे

ड. पिण्याचे पाणी वाया घालवणे

**५. पृथ्वीची काळजी का घ्यावी?**

अ. आपल्याला पाणी सहज मिळेल

ब. वादळ येणार नाही

क. जर आपण निसर्गाची काळजी घेतली, तर निसर्ग आपली काळजी घेईल

ड. नैसर्गिक आपत्ती थांबेल

**Activity 9: Read and speak.**

## विद्यार्थी म्हणून, मी पुढीलप्रमाणे पृथ्वीचे रक्षण करू शकते/शकतो :

- झाडे लावून
- पाणी जपून वापरून
- प्लास्टिक किंवा कचरा नाल्यात न टाकता
- समुद्रकिनारे आणि नद्या स्वच्छ ठेवून
- कचरापेटीचा वापर करून
- माझी शाळा स्वच्छ ठेवून
- माझा देश स्वच्छ ठेवून

**Activity 10: Listen and read.**



मॉरिशसमध्ये वादळाची तिसऱ्या दर्जाची सूचना देण्यात आली आहे.

- जोराचा वारा वाहत आहे.
- समुद्र खवळलेला आहे.
- बाहेर जाऊ नका.
- शाळा बंद आहेत.

## लोकांनी ही सावधगिरी बालगावी :

| | |
|---|---|
| घरात राहा, वादळ गेल्याची सूचना मिळेपर्यंत बाहेर जाऊ नका. |  |
| ताज्या बातम्यांसाठी रेडिओ ऐका आणि टीव्ही पाहा. |  |
| गाडी चालवू नका. |  |
| अन्न आणि औषधांचा साठा ठेवा. |     |

# Theme 4: Animals and Birds
## Importance of Animals
## Activities

Activity 1: Listen and repeat.

Activity 2: Observe and label.

Activity 3: Read and speak.

Activity 4: Identify and speak.

Activity 5: Fill in the blanks.

Activity 6: Dialogue/Role play.

Activity 7: Make simple sentences.

**Activity 1: Listen and repeat.**

## वासरू

ओढाळ वासरू रानी आले फिरू,
कळपाचा घेऊ सोडूनिया

कानामध्ये वारे भरुनिया न्यारे,
फेर घरी फिरे रामोमाळ.

मोकाट मोकाट अफाट अफाट,
वाटेल ती वाट धावू लागे,

विसरुनी भान, भूक नि तहान,
पायांखाली रान घाली सारे.

थकूनिया खूप सरता हुरूप
आठवे कळप तयालागी

फिरू जाता मागे दूर जाऊ लागे,
आणखीच भागे भटकत.

पडता अंधारू लागले हंबरू,
माय! तू लेकरू शोधू येई.

अनिल

**The audio-visual version of the above song may be accessed through this link:**
https://www.youtube.com/shorts/XRoQUfOm6bU

**Activity 2: Observe and label.**

(झाड, तळे, माकड, गाय, मासा, कोंबडी, गोठे, घर, घोडा, गवत, अंडी)



Activity 3: Read and speak.

- गाय - दूध
  गाय गवत खाते.
  गाय दूध देते.

- कोंबडी – अंडी
  कोंबडी धान्य/मका खाते.
  कोंबडी आम्हाला अंडी देते.

- बकरी - मांस
  बकरी गोठ्यात आहे.
  माझ्या मित्राला बकरीचे मांस आवडते.

- मधमाशी - मध
  मधमाशी बागेत आहे.
  मधमाशी मध देते.

- मेंढी - लोकर
  ही मेंढी पांढरी आहे.
  आपल्याला मेंढ्यांपासून लोकर मिळते.

१. कोणता प्राणी दूध देतो?

२. कोणता प्राणी अंडी देतो?

३. आपल्याला मध कोठून मिळतो?

४. मेंढ्यांपासून आपल्याला काय मिळते?

५. बकरीपासून आपल्याला काय मिळते?

**Activity 4: Identify and speak.**



१. हा कोणता प्राणी आहे?

२. हा प्राणी कसा आहे? मोठा/लहान आहे?

३. तो कोणत्या रंगाचा आहे?

४. तो कोठे आहे?

५. तो काय करतो?

६. हा प्राणी कसा/कोणत्या प्रकारे उपयुक्त आहे?

**Activity 5: Fill in the blanks.**

१. ........................ शर्यत जिंकतो. (घोडा, हत्ती)

२. मी वाळवंटात ................वर बसते. (कुत्र्या, उंटा)

३. ......................... मोठे कान असतात. (मांजराला, हत्तीला)

४. ......................... एक पाळीव प्राणी आहे. (बैल, उंट)

५. ......................... जड पिशवी वाहते. (गाढव, उंदीर)

६. माझा ......................... माझ्या घराची राखण करतो. (कुत्रा, उंट)

७. ......................... उंदराच्या मागे धावते. (गाढव, मांजर)

८. ......................... अंडी देते. (हत्ती, कोंबडी)

९. ......................... आकाशात उडतो. (पक्षी, घोडा)

१०. तलावात एक ......................... आहे. (उंदीर, मासा)

**Activity 6: Dialogue/ Role play.**

# प्राणिसंग्रहालयात एक दिवस

राम आणि देवी प्राणिसंग्रहालयात गेले. त्यांच्यामध्ये झालेला संवाद पुढीलप्रमाणे आहे.

**राम:** देवी. वाघाकडे बघ. 

**देवी:** तो खूप मोठा आहे! तिथे बघ राम. तो पक्षी खूप सुंदर आहे! तो मोर आहे. 


**राम:** त्याचे पंख रंगीबेरंगी आहेत. झाडाखाली तुला ते म्हातारे कासव दिसते का? ते हळूहळू चालत आहे. 

**देवी:** हो, मला दिसले. चल पुढे जाऊ या.

**राम:** बापरे! मला मोठी गर्जना ऐकू येत आहे. तो सिंहच असावा. आपण पाहायला जाऊ. बघ. बघ. तो मांस खात आहे. 

**देवी:** तुला माहीत आहे का राम, माझा आवडता प्राणी हत्ती आहे! मला त्याचे मोठे कान आणि लांब सोंड आवडते. 

**राम:** मला आताच एक पक्षी दिसला. तो उडत आहे. मला वाटते हा केस्ट्रेल आहे.



**देवी:** हो, तो खूप सुंदर आहे. तिकडे बघ राम. हा उंट आहे. हा उंट दुबईहून आलेला आहे. 



**राम:** चल, पुढे माकड शोधू या. मला त्याची लांब शेपूट पाहायची आहे.

**देवी:** चांगली कल्पना आहे. आणि माकड पाहिल्यानंतर आपण साप पाहायला जाऊ. 

**राम:** अग नाही. मला सापांची भीती वाटते. तू पुढे जा. मी कॅन्टीनमध्ये तुझी वाट पाहीन.

**देवी:** जशी तुझी इच्छा.

१. राम आणि देवी यांना सर्वात आधी कोणता प्राणी दिसला?
अ. हत्ती ब. मोर क. वाघ ड. सिंह

२. कोणत्या प्राण्याचे पंख रंगीत होते?
अ. मोर ब. केस्ट्रेल क. माकड ड. वाघ

३. कोणता प्राणी हळूहळू चालतो?
अ. उंदीर ब. माकड क. वाघ ड. कासव

४. जेव्हा राम आणि देवी यांनी सिंह पाहिला तेव्हा सिंह काय करत होता?
अ. मांस खात होता ब. मोठ्याने गर्जना करत होता
क. झोपत होता ड. चालत होता

५. माकडाची शेपूट कशी असते?
अ. लहान ब. लांब क. मोठी ड. उंच

६. देवीचा आवडता प्राणी कोणता आहे?
अ. जिराफ ब. वाघ क. मोर ड. हत्ती

७. उंट कोणत्या देशातून आला आहे?

अ. दुबई    ब. मॉरिशस    क. इटली    ड. भारत

८. तुमच्या आवडत्या प्राण्यांची नावे लिहा.

.......................................................................

.......................................................................

.......................................................................

.......................................................................

.......................................................................

**Activity 7: Make simple sentences.**



मुलगी – खेळणे

______________________________

______________________________



कुत्रा – आंघोळ करणे

______________________________

______________________________



कुत्र्याचे घर - स्वच्छ करणे

______________________________

______________________________



अन्न - देणे

______________________________

______________________________



पशुवैद्याकडे - आणणे

______________________________

______________________________



बागेत- फिरायला जाणे

______________________________

______________________________

# Theme 5: Music and Entertainment Media

## Activities

Activity 1: Listen and repeat the song.

Activity 2: Identify the words.

Activity 3: Read and practise.

Activity 4: Underline and rewrite the words.

Activity 5: Read and identify the word.

Activity 6: Fill in the blanks.

Activity 7: Crosswords.

Activity 8: Matching.

Activity 9: Rearrange the words.

Activity 10: Read, identify and write.

Activity 11: Read the passage and encircle the correct answer.

Activity 12: Read and write.

Activity 13: Demonstrate your creativity.

**Activity 1: Listen and repeat the song.**



**पोपट**

गवतासारखा माझा रंग
हिरवे हिरवे माझे अंग
उंच उडतो मित्रांसंग
पेरू मिरच्या खाण्यात दंग
दिवस असो वा रात्र
उडतो मी सगळ्यांसंग


**The audio-visual version of the above poem/song may be accessed through the link:**

https://youtu.be/fH-H0U9l_K8?si=D-K1scSNr6cE1yRc

**Activity 2: Identify the words.**



रेडिओ



संगणक




टीव्ही



मनोरंजन



चित्रपटगृह



मंच




मोबाईल फोन



खंजिरी



नाटक




तुतारी

**Activity 3: Read and practise.**



रेडिओ

रे + डि + ओ



संगणक

सं + ग + ण + क



टीव्ही

टी + व्ही



मनोरंजन

म + नो + रं + ज + न



चित्रपटगृह

चि + त्र + प + ट + गृ +ह



मंच

मं + च



मोबाईल फोन

मो + बा + ई + ल

फो + न



खंजिरी

खं + जि + री



नाटक

ना + ट + क



तुतारी

तु + ता + री

**Activity 4: Underline and rewrite the words.**

१. सतार एक वाद्य आहे. ..............................................

२. माझ्याकडे बासरी आहे. ..............................................

३. ही तुतारी आहे. ..............................................

४. तुझ्याकडे गिटार आहे का ? ..............................................

५. माझ्या आजीकडे एक लहान रेडिओ आहे. ..............................................

६. हे चित्रपटगृह आहे. ..............................................

७. रोहन टीव्ही पाहतो. ..............................................

८. मंच मोठा आहे. ..............................................

९. तुझा मोबाईल फोन नवा आहे. ..............................................

**Activity 5: Read and identify the word.**



## बासरी

एक बासरी

ही बासरी आहे.

माझ्याकडे बासरी आहे.

मला बासरी वाजवणे/ऐकणे आवडते.

बासरी बांबूपासून बनवली जाते.

बासरीला सहा – सात छिद्र असतात.

ही बासरी सुंदर आहे.

बासरीचे सूर मधुर असतात.

श्री कृष्णाच्या हातात बासरी आहे.

**Activity 6: Fill in the blanks.**

( संगणक , मोबाईल फोन , टीव्ही , चित्रपट , रेडिओ )




१. खोलीत एक .................... आहे.



२. मी एक नवा .................................... विकत घेते.



३. मी ................... ऐकतो / ऐकते.



४. माझ्याकडे एक .................. आहे.



५. मी टीव्हीवर ................... पाहतो / पाहते.

**Activity 7: Crossword.**

**Identify and colour 10 words related to music and entertainment using different colours. Then, copy the words in the space given below.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रे | सि | ळ | जा | बा | सं | टी | व्ही |
| डि | ने | झां | णे | स | ता | र | न |
| ओ | मा | जा | चि | री | मो | त | ट |
| ना | च | णे | ना | खे | बा | ब | पा |
| चि | त्र | प | ट | ळ | ई | ला | ह |
| न | मं | ऐ | क | णे | ल | ळ | णे |
| टी | च | मा | सं | गी | त | क | ला |
| झा | क | डी | ट | सं | ग | ण | क |

.............................................................. ..............................................................

.............................................................. ..............................................................

.............................................................. ..............................................................

.............................................................. ..............................................................

.............................................................. ..............................................................

**Activity 8: Matching.**



गाणे



पाहणे



ऐकणे



खेळणे



वाजवणे



नाचणे

**Activity 9: Rearrange the words.**

१. मनोरंजक - आहे - चित्रपट

........................................................................................................................................

२. गातो - गायक - गाणे

........................................................................................................................................

३. आहे - मोठा - मंच

........................................................................................................................................

४. वाजवतो - तो - वाद्ये

........................................................................................................................................

५. ऐकतो - संगीत - राहुल

........................................................................................................................................

**Activity 10: Read, identify and write.**

**Identify and write 5 action verbs and 5 words related to music and entertainment.**



राहुल : नमस्कार रवि.
रवि : नमस्कार राहुल. तू खूप आनंदी दिसत आहेस!
राहुल : मी चित्रपट पाहायला जात आहे.
रवि : कोणता चित्रपट ?
राहुल : ‘ छावा ’
रवि : मी टीव्हीवर चित्रपट पाहतो.
राहुल : मी पण माझ्या मोबाईलवर गेम खेळतो.
रवि : मला रेडिओ ऐकायला आवडते. तू गातोस का ?
राहुल : नाही. मी नाचतो. मी शाळेत एक नृत्य सादर करत आहे.
रवि : मी संगीत दिनानिमित्त एक गाणे गात आहे.
राहुल : माझी बहीण सतार वाजवत आहे.
रवि : मग खूपच मजा येईल.

| Action Verbs | Words |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |

**Activity 11: Read the passage and encircle the correct answer.**



आज संगीत दिवस आहे. आम्ही शाळेत संगीत दिवस साजरा करत आहोत. मंच खूप सुंदर दिसत आहे. बरेच विद्यार्थी सहभागी होत आहेत. राहुल बासरी वाजवत आहे. अमर गाणे गात आहे. इतर विद्यार्थी झांजा, गिटार आणि तबला वाजवत आहेत. इयत्ता नववीचे विद्यार्थी एक नृत्य सादर करत आहेत. सर्वजण टाळ्या वाजवत आहेत. ते खूप आनंदी आहेत.

१. आम्ही शाळेत कोणता दिवस साजरा करत आहोत ?

अ. क्रिडा    ब. अन्न

क. संगीत    ड. जन्म

२. मंच कसा दिसत आहे ?

अ. सुंदर    ब. मोठा

क. लहान    ड. अस्वच्छ

३. राहुल कोणते वाद्य वाजवत आहे ?

अ. तुतारी    ब. गिटार

क. बासरी    ड. तबला

४. कोण गाणे गात आहे ?

अ. राहुल    ब. अमर


क. बरेच विद्यार्थी    ड. आठवीचे विद्यार्थी

५. प्रत्येकाला कसे वाटते ?

अ. रागावलेला    ब. दु:खी

क. भीती    ड. आनंदी

**Activity 12: Read and write.**



१. चित्रात किती माणसे आहेत ?

२. बाबा काय करत आहेत ?

३. आई काय करत आहे ?


४. मुलगा कोणते वाद्य वाजवत आहे ?

५. मुलगी कोणते वाद्य वाजवत आहे ?

६. मेजावर काय आहे ?

**Activity 13: Demonstrate your creativity.**

Present a short poem/ a song/ a dance.
Identify the following pictures, colour and write two simple sentences on each.



१. ही .................. आहे.

अ. ....................................................................................

ब. ....................................................................................



२. हा .................. आहे.

अ. ....................................................................................

ब. ....................................................................................



३. हा .................. आहे.

अ. ....................................................................................

ब. ....................................................................................

# Theme 6: Celebrations and Festival
# Wedding

## Activities

Activity 1: Listen and repeat the song.

Activity 2: Sentences on wedding.

Activity 3: Invitation card.

Activity 4: Fill in the Invitation card.

Activity 5: Wedding clothing and accessories.

Activity 6: Choose and write the correct word.

Activity 7: Wedding rituals.

Activity 8: Rearrange the words.

Activity 9: Wedding food vocabulary.

Activity 10: Comprehension passage.

Activity 11: Fill in the blanks.

Activity 12: Create a wedding card.

**Activity 1:Listen and repeat the song.**

## गोरी गोरीपान, फुलासारखी छान

गोरी गोरीपान, फुलासारखी छान
दादा, मला एक वहिनी आण

गोऱ्या गोऱ्या वहिनीची अंधाराची साडी
अंधाराच्या साडीवर चांदण्यांची खडी
चांदण्यांच्या पदराला बिजलीचा बाण !

वहिनीला आणायाला चांदोबाची गाडी
चांदोबाच्या गाडीला हरणांची जोडी
हरणांची गाडी तुडवी गुलाबाचे रान !


वहिनीशी गट्टी होता तुला दोन थापा
तुला दोन थापा, तिला साखरेचा पापा
बाहुल्यांच्या परी होऊ दोघी आम्ही सान !

कवी- ग. दि. माडगूळकर

**The audio-visual version of the above song may be accessed through this link:**

https://www.youtube.com/watch?v=bf_Xd3W9o08&list=RDbf_Xd3W9o08&index=1

**Activity 2: Sentences on wedding.**




१. लग्न हा आनंदाचा दिवस असतो.

२. वधू आणि वर लग्न करतात.

३. नातेवाईक आणि मित्र लग्नाला येतात.

४. लग्नात स्वादिष्ट जेवण असते.

५. प्रत्येकजण सुंदर कपडे घालतो.

**Activity 3: Invitation card.**



**Activity 4: Fill in the Invitation card.**

यजमानपान - सकाळी १० वाजता - पांडुरंग क्षेत्र मंदिर, कास्कावेल

राजेश - रविवार १२ जुलै २०२५ - रोहिणी

**शुभ विवाह**



वर ..................

वधू ..................


...................... : शनिवार ११ जुलै २०२५

लग्नाची तारीख : ........................


स्थळ : ................................

वेळ : ............................

**Activity 5: Wedding clothing and accessories.**



नऊवारी साडी



कुर्ता



मंगळसूत्र



जोडवी




दागिने

**Activity 6: Choose and write the correct word.**



( नऊवारी साडी, जोडवी, मंगळसूत्र )

.........................................................



( नऊवारी साडी, दागिने, साडी )

.........................................................



( कुर्ता, साडी, नऊवारी साडी )

.........................................................



( दागिने, साडी, मंगळसूत्र )

.........................................................



( साडी, मंगळसूत्र, कुर्ता )

.........................................................

**Activity 7: Wedding rituals.**



### साखरपुडा समारंभ

१. साखरपुडा कधी आहे?
२. साखरपुड्याला कोण कोण येणार आहे?
३. साखरपुड्यासाठी कोणती मिठाई बनवली जाते ?



### हळदी विधी

१. हळदी विधी कधी आहे ?
२. हळदीसाठी खास तयारी केली जाते का ?
३. हळदीच्या समारंभात नाच-गाणी झाली का ?



### कन्यादान

१. कन्यादान कोण करणार आहे ?
२. कन्यादान विधी कधी होणार आहे ?
३. या विधीचे महत्त्व काय आहे ?



### सप्तपदी

१. सप्तपदीत वधू-वर किती पाऊले चालतात ?
२. प्रत्येक पावलाचा अर्थ काय आहे ?
३. सप्तपदीच्या वेळी कोणते वचन दिले जातात ?



### लग्न विधी

१. वधू-वर मंडपात कधी येतात?
२. मंगलसूत्र कोण घालणार आहे?
३. लग्नाचे मुख्य विधी कोणते आहेत?

**Activity 8: Rearrange the words.**

१. आहे - माझा - आज - लग्न - शेजारी - करत

..........................................................................................................

२. लग्नासाठी - कपडे - घालतो / घालते - सुंदर - मी

..........................................................................................................

३. पाहुणे - हॉलमध्ये - आहेत - अनेक

..........................................................................................................

४. भेट - वधू - वरांना - गेलो/ गेले - मी - देण्यासाठी

..........................................................................................................

५. जेवण - मी - घेतले - स्वादिष्ट

..........................................................................................................

**Activity 9: Wedding food vocabulary.**



१. जेवण खूप चवदार होते.

______________________________

______________________________



२. पाहुण्यांनी लाडू खाल्ले.

______________________________

______________________________



३. कानवला खूप गोड होता.

______________________________

______________________________



४. पाहुण्यांना गरम पुरणपोळी आवडते.

______________________________

______________________________



५. लग्नाचा केक मोठा आहे.

______________________________

______________________________

**Activity 10: Comprehension passage.**



लग्न हा एक अत्यंत आनंदाचा दिवस असतो. वधू आणि वर आपल्या कुटुंबीयांसमोर आणि मित्रमंडळीसमोर लग्न करतात. या खास प्रसंगी अनेक लोक उपस्थित राहतात. सर्वजण सुंदर कपडे घालतात. खाण्यासाठी स्वादिष्ट पदार्थांची मेजवानी असते आणि प्रत्येकजण या विशेष दिवसाचा आनंद घेतो.

**Activity 11: Fill in the blanks.**

(लग्नात, लग्न, आनंदाचा, स्वादिष्ट, सुंदर)

१. लग्न हा एक अत्यंत .................... दिवस असतो.

२. वधू आणि वर .................... करतात.

३. नातेवाईक आणि मित्र .................... येतात.

४. सर्वजण .................... कपडे घालतात.

५. लग्नात .................... अन्न असते.

**Activity 12: Create a wedding card.**

# Theme 7: Ethics and Values
# Hard work and Perseverance

## Activities

Activity 1: Listen and answer the questions.

Activity 2: Write the correct sentences.

Activity 3: Rearrange the sentences.

Activity 4: Read the passage and answer the questions.

Activity 5: Read and tick the answer.


Activity 6: Construct simple sentences.

Activity 7: Cloze tests.

Activity 8: Categorise the sentences.

Activity 9: Talk about the good actions.

**Activity 1: Listen and answer the questions.**




## मुंगी आणि टोळ

उन्हाळयात, मुंगी दिवसभर हिवाळयासाठी अन्न गोळा करण्यासाठी खूप कष्ट करत असे. दरम्यान, टोळाने आपले दिवस खेळण्यात आणि गाण्यात घालवले. हिवाळा आला तेव्हा मुंगीकडे भरपूर अन्न होते, परंतु टोळ भुकेलेला होता आणि थंडीने थरथरत होता.

मग, त्याने मुंगीला मदत मागितली. मुंगीने नकार दिला आणि टोळाला स्वतःचे अन्न शोधण्यास सांगितले. टोळाने सर्वत्र अन्न शोधले, पण त्याला अन्न मिळाले नाही. टोळाला आपली चूक लक्षात आली. मुंगीला त्याची दया आली आणि तिने आपले अन्न त्याच्याबरोबर वाटून घेतले.

टोळाच्या हे लक्षात आले की कठोर परिश्रम आणि भविष्यासाठी नियोजन करणे आवश्यक आहे. तो एक महत्त्वाचा धडा शिकला: आजच चांगल्या उद्यासाठी तयारी करा.

**The audio-visual version of the above story may be accessed through this link:**
https://www.youtube.com/watch?v=gZbpf0IbX2I

**Activity 2: Write the correct sentences.**











**Activity 3: Rearrange the sentences.**

## बियाण्यांपासून कोथिंबीर उगवण्याची पद्धत :

**आवश्यक साहित्य:**

- धणे
- कुंडी/भांडे/कप
- पाणी
- माती

**पायऱ्या योग्य क्रमाने लिहा:**

- पेरलेले धणे रूजण्याची वाट पहा.
- कुंडीला/ भांड्याला सूर्य प्रकाशात ठेवा.
- पेरलेल्या धण्यांना थोड्या मातीने झाकून टाका.
- दररोज पाणी घाला.
- मातीला थोडेसे पाणी द्या.

१. कुंडीत / कपात माती टाका.

२. मातीवर बिया शिंपडा.

३. ............................................................

४. ............................................................

५. ............................................................

६. ............................................................

७. ............................................................

तुमचे अनुभव सांगा.

**Activity 4: Read the passage and answer the questions.**

रवी नावाचा एक मुलगा होता ज्याला अभ्यास करायला आवडत नव्हते. तो दिवसभर खेळत होता आणि गृहपाठ करीत नव्हता. परीक्षेचा निकाल आला तेव्हा रवी नापास झाला आणि त्याला खूप वाईट वाटले. त्यानंतर त्याने बदलण्याचा आणि कठोर परिश्रम करण्याचा निर्णय घेतला. तो वर्गात अधिक लक्ष देऊ लागला आणि दररोज अभ्यास करू लागला. कठीण असतानाही त्याने सोडून दिले नाही. हळूहळू, तो सुधारला आणि शेवटी तो परीक्षेत पास झाला. रवीला कळले की कठोर परिश्रम आणि चिकाटी यश मिळवून देतात.

१. अभ्यास करायला कोणाला आवडत नव्हते?

___

२. परीक्षेत नापास झाल्यानंतर रवीला कसे वाटले?

___

३. परीक्षेत नापास झाल्यावर रवीने काय करण्याचा निर्णय घेतला?

___

४. अभ्यास करणे कठीण झाले तेव्हा रवीने चिकाटी कशी दाखवली?

___

५. अखेरीस रवी कोणता धडा शिकला?

___

तुम्हाला आलेल्या एखाद्या कठीण प्रसंगातून तुम्ही कसे बाहेर पडलात ते सांगा.

**Activity 5: Read and tick the answer.**

१. ताई सायकल चालवायला शिकत आहे आणि ती पडते. तिने

☐ पुन्हा प्रयत्न करावे.

☐ आशा सोडावी.

---

---

२. दिवेशला त्याचा अभ्यास कसा करावा हे समजत नाही. त्याने

☐ शिक्षकाची मदत घ्यावी.

☐ गप्प राहावे.

---

---

३. रामाला परीक्षेत कमी गुण मिळाले. त्याने

☐ सोडून द्यावे.

☐ मनापासून शिकावे.

---

---

**Activity 6: Construct simple sentences.**



मुलगा – सायकल

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________



सायकल - खाली पडणे

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________



पाय – जखमी

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________



मित्र – मदत करणे



शेवटी - घरी परत जाणे

**Activity 7: Cloze tests.**

**(पिऊ, थोडे, लहान, पाणी, तो )**

एके दिवशी एक कावळा खूप तहानलेला होता.----------------------- पाण्याच्या शोधात सगळीकडे उडत होता. त्याला एक भांडे दिसले. त्यात -------------------पाणी होते. त्याची चोच पाण्यापर्यंत पोहोचण्यासाठी खूपच ---------------------- होती. त्याला एक कल्पना सुचली. त्याने खडे उचलले. त्याने ते भांड्यात टाकले.

------------------- वर आले. कावळा पाणी------------------- शकला म्हणून तो आनंदी होता.

**आपल्याला जे हवे आहे ते मिळवण्यासाठी आपण काम करत राहिले पाहिजे.**

**Activity 8: Categorise the sentences.**

| घर | शाळा | समाज |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

१. देश स्वच्छ ठेवणे.

२. शिक्षकांचा आदर करणे.

३. वर्गात मन लावून अभ्यास करणे.

४. खोली साफ करणे.

५. कुटुंबातील सदस्यांशी नम्रपणे बोलणे.

६. शेजाऱ्यांना मदत करणे.

७. वर्गमित्रांना मदत करणे.

८. आजी-आजोबांना नमस्कार करणे.

९. पालकांना मदत करणे.

१०. सिनेमात प्रवेश करण्यासाठी रांगेत उभे राहणे.

**Activity 9: Talk about the good actions.**











ISBN 978-99949-54-98-8